# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## सांताक्रुझ (पुर्व) मुंबई येथील विमानपत्तन प्राधिकरणाच्या हददीतील जागेवरील बाधित झोपडीधारकांच्या स्थलांतरणाबाबत

**(१) ४५९१२ (३०-१०-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांताक्रुझ (पुर्व) मुंबई येथील विमानपत्तन प्राधिकरणाच्या हददीतील जागेवरील प्रकल्प बाधित झोपडीधारकांच्या स्थलांतरणाबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास पालकमंत्री मुंबई उपनगर जिल्हा तथा पर्यटन, पर्यावरण मंत्री महोदय व संबंधित मंत्री महोदय यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) व (२) बाबत विमानपत्तन प्राधिकरणाच्या जागेमधील ११ प्राधान्य सूची क्षेत्रांतील झोपडीधारकांच्या पुनर्वसन प्राधान्याने करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदर ११ प्राधान्य सूचीपैकी १० विभागांचे अंतिम परिशिष्ट-II पारीत झाले आहे त्यानुसार ३३१३ झोपडीधारक पात्र ठरले आहेत. उर्वरित विभागातील अंतिम परिशिष्ट-II चे काम प्रगतीपथावर आहे. सदर झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याकरीता कुर्ला प्रिमिअर कंपाऊंड येथील SRA च्या ताब्यात असलेल्या सदनिकांचे “जसे आहे तसे” परिस्थिती मध्ये एमएमआरडीए कडे हस्तांतरण करण्यात आले आहे. क्रांतीनगर विभागातील ७६८ पात्र झोपडीधारकांपैकी अद्याप पर्यंत १२७ झोपडीधारकांचे पुनर्वसन कुर्ला प्रिमियर कंपाऊंड, कुर्ला येथील इमारत क्र. ७ मधील बी व जी येथील सदनिकांमध्ये करण्यात आलेले आहे. क्रांतीनगर विभागातील ५०८ पात्र झोपडीधारकांची सोडत दि. ११.०८.२०२३ रोजी काढण्यात आली असून त्यांचे पुनर्वसन कुर्ला प्रिमियर कंपाऊंड, कुर्ला येथील इमारत क्र. २ मधील ए, बी, सी, डी, इ, जी या इमारतींमधील रिक्त सदनिकांमध्ये करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. कुर्ला प्रिमिअर कंपाऊंड येथील इमारतीमधील सदनिका ह्या ना-दुरुस्त अवस्थेत आहेत, त्यामुळे कुर्ला प्रिमियर कंपाऊंड, कुर्ला येथील इमारत क्र. २, ३, ७ व १७ चे दुरुस्तीचे कामकाज एमएमआरडीए मार्फत करण्यात येत आहे. सदर सदनिकांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यावर विमानपत्तन प्राधिकरणाच्या जागेवरील क्रांतीनगर विभागातील पात्र झोपडीधारकांच्या पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बनावट रिफलेक्टर किटमुळे शासनाची फसवणुक केल्याबाबत

**(२) ५०५७६ (२२-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी अप्पर परिवहन आयुक्तांनी दिनांक १३ मे, २०२२ रोजी परिपत्रक काढून राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी सीमा तपासणी नाके यांना ब्रँन्ड इगल्स बिझनेस सोल्युशन यांचे रिफलेक्टर किट वाहनावर लावण्याचे स्पष्ट निर्देश दिलेले असल्यामुळे याचाच फायदा दलांली घेऊन परिवहन अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठया प्रमाणात बनावट रिफलेक्टर किट ७०० रूपयांनी वाहनधारकांना विकेले जात असून बनावट रिफलेक्टर किट लावलेली वाहने पासिंग होत असल्याची माहिती दिनांक २३ सप्टेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची लेखी तक्रार शासन निर्देशीत ब्रॅन्ड इगल्स बिझनेस सोल्युशन या पुरवठादार एजन्सीने ठाणे येथील नैपाडा पोलीस ठाण्यात दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०३-२०२४) :**(१) या संदर्भात दि.१३.०५.२०२२ रोजी परिवहन आयुक्त कार्यालयाने कोणतेही परिपत्रक जारी केलेले नाही. परंतु दि.३१.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मान्यताप्राप्त १) मे. अव्हेरी डेनिसन (ई) प्रा.लि., २) मे. डाऊमिंग रिफ्लेक्टीव्ह मटेरियल इंडिया प्रा. लि. ३) मे. ओराफोल इं. प्रा.लि. व ४ ) थ्री एम इंडिया प्रा. लि. या ०४ उत्पादकांनी M/s Brand Eagles Business Solution, Thane यांच्या Mahavahan या पोर्टल/ॲपवर (एमआयएस प्रणालीवर) परावर्तक (Reflectors), रिफ्लेक्टीव्ह टेप्स (Reflective Tapes) आणि मागील बाजूस रियर मार्किंग प्लेट / टेपबाबतचे अभिलेख ठेवण्यास केलेल्या विनंतीनुसार निवेदनांची नोंद अभिलेखावर घेण्यात येत आहे असे प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना कळविण्यात आले आहे.
(२) नौपाडा पोलीस ठाणे येथे मे.ब्रँड इगल्स बिझनेस सोल्युशन या कंपनीद्वारे गुन्हा दाखल केला नसल्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, नौपाडा पोलीस स्टेशन, ठाणे यांनी कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दिव्यांगांच्या अनुदानीत विशेष शाळा, कर्मशाळा संलग्न वसतीगृहातील विविध पदांना सातवा वेतन लागू करणेबाबत

**(३) ५७३०४ (२६-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दिव्यांगाच्या शाळा कर्मशाळेवरील कार्यरत वसतीगृह अधीक्षक, गृहपाल यांचे वेतनश्रेणीत सूधारणा करणेबाबतचा अहवाल मा.आयुक्त, दिव्यांग कल्याण यांनी शासनास दिनांक २ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास सादर केला असून तो शासन स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य वेतन सुधारणा समिती वेतन आयोग समोर (मा.बक्षी समिती) मंत्रालय, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर सुनावणी होऊन बाराच काळ झाला असून अद्यापपर्यंत खंड २ प्रकाशित न झाल्याने राज्यातील दिव्यांगाच्या शाळा कर्मशाळेवरील कार्यरत वसतीगृह अधीक्षक, गृहपाल यांची वेतनश्रेणी अद्याप लागू झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने राज्यातील दिव्यांगांच्या अनुदानीत विशेष शाळा, कर्मशाळा संलग्न वसतीगृह अधीक्षक व गृहपाल यांना ६ व्या वेतन आयोगातील त्रुटी दूर करुन ७ व्या वेतन आयोगात एस-१० लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०४-२०२४) :** (१) नाही.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

राज्यातील दिव्यांगांच्या शाळा कर्मशाळेवरील कार्यरत वसतीगृह अधीक्षक, गृहपाल यांचे वेतनश्रेणीत सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव राज्य वेतन सुधारणा समितीपुढे सादर केला होता. वित्त विभागाने दि. दि.१३.०२.२०२३ रोजी राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ चा अहवाल खंड-२ मधील वेतनश्रेण्यांविषयक अनुषंगिक शिफारशी स्विकृत करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला असून, त्यामध्ये उक्त पदांचा समावेश केलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात इलेक्ट्रिक वाहन खरेदीतून सूट देण्याबाबत

**(४) ५८०२१ (२६-०४-२०२३). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात इलेक्ट्रिक वाहन खरेदी मधून दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत सूट देण्याचा निर्णय पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने घेतला असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महागड्या इंधनाचा पर्याय व पर्यावरणाचा -हास रोखण्यासाठी राज्यशासनाने इलेक्ट्रिक व्हेईकल धोरण, २०२१ आखले असून या धोरणातंर्गत दिनांक १ जानेवारी, २०२२ पासून सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांना इलेक्ट्रिक वाहन खरेदी व वापरणे सक्तीचे केले मात्र काही विभागांना इलेक्ट्रिक वाहन खरेदीतून सूट देण्यात आली आहे, हे निदर्शनास आले आहे,
(३) असल्यास, सदर धोरण ठरविताना इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशनची निर्मिती दर ६० कि.मी. वर करण्याची आवश्यकता असतानाही न करताच इलेक्ट्रिक व्हेईकल धोरण २०२१ आखले ते परिपूर्ण नसल्याने हे धोरण रद्द करुन पुन्हा सर्वसाधारण धोरण तयार करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले आहे, त्यानुंषगाने इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन राज्यातील बेरोजगारांना देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
शासन निर्णय दि.१२.०४.२०२२ नुसार ज्या शासकीय, निमशासकीय संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यामधील अधिकाऱ्यांना कामकाजाचा भाग म्हणून दौरा करावा लागतो अशा कार्यालयांना/अधिकाऱ्यांना दि.३१.०३.२०२३ पर्यंत इलेक्ट्रिक वाहन खरेदी करण्यापासून सूट देण्यात आली आहे.
(२) "महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२१" नुसार, शहरांतर्गत परिचालित होणारी सर्व नवीन शासकीय, निम शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था मार्फत व शासनाच्या निधीमधून खरेदी करण्यात येणारे वाहने इलेक्ट्रिक वाहने असावीत असे बंधनकारक करण्यात आले आहे तथापि ज्या शासकीय, निमशासकीय संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यामधील अधिकाऱ्यांना कामकाजाचा भाग म्हणून दौरा करावा लागतो अशा कार्यालयांना/अधिकाऱ्यांना इलेक्ट्रिक वाहन खरेदी करण्यापासून सूट देण्यात आली आहे.
(३) "महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२१" नुसार चार्जिंग स्टेशनची निर्मिती करण्याची जबाबदारी ऊर्जा विभागास देण्यात आली आहे. ऊर्जा विभागाने यासाठी महावितरण कंपनीचे नोडल एजन्सी म्हणून नेमणूक केली आहे. महावितरणने आतापर्यंत ६३ ठिकाणी ११३ चार्जिंग स्टेशन कार्यन्वित केले असून यासाठी रु.२.५९ कोटी प्रोत्साहनपर रक्कम वितरीत केली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव मनपाचे तात्कालीन प्र.नगररचना सहाय्यक संचालक यांनी भूसंपादनाचे मंजूर देयक बेकायदेशीररित्या महापौर कार्यालयात पाठवून गहाळ केल्याबाबत

**(५) ५८८४९ (११-०५-२०२३). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव मनपाचे तत्कालीन प्र.नगररचना सहाय्यक संचालक यांनी आरक्षण क्र.११२ बगीचा साठीच्या भूसंपादन प्रस्ताव क्र.५८/०७ व ६०/०७ मधील आयुक्तांनी मंजूर केलेले देयक दिनांक २ फेब्रुवारी, २०१७ रोजी महापौर कार्यालयात पाठविले असून, सदरचे मंजूर देयक महापौर कार्यालयातून गहाळ झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन प्र.नगररचना सहाय्यक संचालक यांचेविरुद्ध जमीन मालक श्री.मुंदडा यांनी दिनांक ११ मार्च, २०२१ रोजी म.संचालक, नगररचना, पुणे यांचेकडे तक्रार अर्ज केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने सह संचालक, नगररचना, नाशिक विभाग यांनी पत्र क्र.नवि/जळगाव महानगरपालिका/तक्रार/९२ दिनांक २५/०७/२०२२ अन्वये संचालक, नगररचना, पुणे यांचेकडे अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जळगाव शहर पोलीस स्टेशन दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ रोजीचे पत्र क्र.२३५०/२०१९ व त्यानंतर दि.२७ ऑगस्ट, २०२२ मध्ये कळविल्यानंतर ही आयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांनी कोट्यवधीचे मंजूर देयक गहाळ झाल्याबाबत चौकशी करून पोलिसांकडे तक्रार केली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली अये काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०४-२०२४) :** (१) नाही, हे खरे नाही

(२) होय, हे खरे आहे

(३) होय, हे खरे आहे

(४) व (५) होय, हे खरे आहे.

तथापी तत्कालीन आयुक्त यांनी दिनांक २६/१२/२०१९ अन्वये यापुर्वीच जिल्हा पोलीस अधिक्षक यांना पत्रान्वये जळगाव पोलीस विभागाकडील, शहर पोलीस ठाणे जळगाव यांचेकडेस दाखल असलेले सर्व तक्रारी अर्ज निकाली काढण्यात यावे असे पत्र देण्यात आलेले होते. सदरची परिस्थिती दि. २७/०८/२०२० रोजी व आजही कायम असल्याने पोलिसांकडे तक्रार करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव शहर महानगरपालिकेत बनावट महासभा ठराव तयार केलेबाबत

**(६) ६२८३१ (२६-०४-२०२३). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहर पोलीस स्टेशन कडून आयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांना दिनांक ५ डिसेंबर, २०१९ रोजी जावक क्र.३८५३/२०१९अन्वये देण्यात आलेल्या पत्रात दिनांक २० जून, २०१७ रोजी झालेल्या महासभा क्र.४४ मधील विषय क्र.१८ बाबत ठराव क्र.७०३ हा बनावट असल्याने चौकशी करून गुन्हा दाखल करणे बाबत नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरक्षण क्र.११२, भूसंपादन प्रस्तावाबाबत दि. २० जून, २०१७ रोजी महासभा ठराव क्र.७०३ प्रत्यक्ष चर्चा न होता झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दि.२० जून, २०१७ रोजीच्या महासभा क्र.४४ च्या अजेंडामध्ये सदर भूसंपादनाचा विषय नव्हता व आयत्या वेळेच्या विषयांचा अजेंडा निघाला नव्हता, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, दि. २० जून, २०१७ रोजीच्या महासभेच्या कामकाजाच्या चित्रफिती मध्ये ठराव क्र.७०३ चा विषय

क्र.१८ बाबत कुठलीही चर्चा झाल्याचे दिसून आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जळगाव शहर पोलीस स्टेशन कडील दिनांक ०५ डिसेंबर, २०१९ रोजीचे पत्र क्र.३८५३/२०१९ मध्ये कळविल्यानंतर ही आयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांनी बनावट महासभा ठराव क्र. ७०३ बाबत चौकशी करून पोलिसांकडे तक्रार केली नाही, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तक्रार नोंदविण्यास झालेल्या विलंबाचे कारण काय आहेत व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०४-२०२४) :** (१) हो हे खरे आहे,
तथापि, सदर पत्रात आपल्या स्तरावरून चौकशी करुन, त्यात गुन्हयाचा प्रकार आढळून आल्यास आपल्याकडील एक अधिकारी प्राधिकृत करून, संबंधित दोषी व्यक्तीविरुध्द इकडील पोलिस स्टेशनला तक्रार देण्यात यावी, असे नमूद केले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
महापौर यांचे नगरसचिव यांना दिलेल्या निर्देशानुसार, उक्त महासभेत सदरचा विषय हा आयत्यावेळेचा विषय म्हणून घेण्यात आला आहे.
(४) होय, हे खरे आहे.
महासभेच्या कामकाजाची चित्रफितीचे अवलोकन केले असता, विषय क्र. १८ बाबत प्रथम दर्शनी चर्चा दिसून येत नाही. तथापि, चित्रफितीमध्ये काही ठिकाणी स्पष्ट आवाज येत नसल्याने अवलोकन होत नाही.
(५) होय, हे खरे आहे.
(६) याबाबत, महानगरपालिकेमार्फत प्राथमिक चौकशी करून नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**ठाणे-कल्याण दरम्यान समांतर रस्ता करण्याच्या मागणीबाबत**

**(७) ६३२३२ (२५-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे ते कल्याण प्रवासाकरिता लोकल व्यतिरिक्त अन्य कुठलेही साधन नसल्याने ठाणे-कल्याण दरम्यान समांतर रस्त्याची मागणी होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे-कल्याण दरम्यान रस्ता वाहतुकीचा प्रकल्प उभारण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय, असल्यास, कधीपर्यंत हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सद्यस्थितीत ठाणे ते कल्याण जाण्यासाठी ऐरोली-महापे-कल्याण फाटा-कटाई नाका मार्गे तसेच ठाणे येथून मुंबई नाशिक महामार्गावरुन राजनोली मार्गे कल्याण कडे जाण्यासाठी रस्ता उपलब्ध आहे. याशिवाय प्राधिकरणामार्फत कल्याण, नाशिक महामार्ग येथील दापोडा येथे माणकोली ते मोठागांव दरम्यान ४ पदरी रस्त्याचे व ६ पदरी पुलाचे उल्हास खाडीवर काम प्रगतीपथावर आहे. याशिवाय कल्याण बाह्य वळण रस्ता ऐरोली कटाई नाका भाग १ व भाग २ रस्ता, तळोजा एम.आय.डी.सी. ते खोणी रस्ता, पनवेल-ठाणे राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वरील खोणी रस्त्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

दरम्यानच्या काळात ठाणे महानगरपालिका यांचेमार्फत रेतीबंदर ते दिवा गावापर्यंत विकास आराखड्यातील ३० मी. रस्त्याचा विकास करणेबाबतची मागणी प्राधिकरणाकडे अर्थसहाय्य मिळणेकरिता अथवा प्राधिकरणामार्फत सदर रस्त्याचा विकास करणेबाबत कळविलेले होते. सद्यस्थितीत सदर रस्त्याचा विकास करणेबाबत तांत्रिक बाबी व प्रकल्पाची व्यवहार्यता लक्षात घेऊन निधी उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजित आहे.

---

## नाशिक शहरातील मेट्रो रेल प्रकल्पास मंजुरी मिळण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत

**(८) ६४६९७ (२२-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील मेट्रो रेल प्रकल्पास मंजुरी मिळण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नाशिक मेट्रो निओ प्रकल्पाचा प्रस्ताव दि.०९.०९.२०१९ रोजी केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. गृहनिर्माण व शहरी कामकाज मंत्रालय, भारत सरकार आणि सर्व संबंधित मंत्रालयांकडून प्रस्तावाचे मूल्यांकन केल्यानंतर, सार्वजनिक गुंतवणूक मंडळाकडून (PIB) मंजुरीसाठी प्रस्ताव वित्त मंत्रालयाकडे पाठवण्यात आला होता. सार्वजनिक गुंतवणूक मंडळाने (PIB) दिनांक २४.०३.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रस्तावाला मान्यता दिली आणि अंतिम मंजुरीसाठी कॅबिनेट सचिवालय आणि प्रधानमंत्री कार्यालयाकडे पाठवण्यात आला.

सदर प्रकल्प प्रस्तावाच्या आढावा घेण्यासाठी दिनांक १५.०२.२०२३ आणि १५.०३.२०२३ रोजी प्रधानमंत्री कार्यालय, आवास व शहरी कार्य मंत्रालय, रस्ते परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय, रेल्वे बोर्ड, महामेट्रो आणि नाशिक महानगरपालिका अधिकाऱ्यांसह संयुक्त बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये पंतप्रधान कार्यालयाने केलेल्या सुचना विचारात घेऊन महामेट्रोद्वारे नाशिक मेट्रो निओ प्रकल्पाचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

---

## वडाळा (मुंबई) येथील मिठागरांच्या जागांवर डेब्रिज व अतिक्रमणांमुळे खारफुटीचे नुकसान होत असल्याबाबत

**(९) ६४८९५ (२७-०८-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा (मुंबई) येथील मिठागरांच्या जागांवर डेब्रिज, अतिक्रमणे आढळून आल्यामुळे तेथील खारफुटीचे नुकसान होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त मिठागरांवरील डेब्रीज आणि अतिक्रमणे हटविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०४-२०२४) :** (१) मौजे वडाळा मिठागर न.भु.क्र.१४५ जागेचे लिज होल्डर श्री.मुरारीलाल नवलराम गारोडिया यांनी दिनांक २१.०४.२०२२ सुमार या क्षेत्रामध्ये मिठागराच्या बांधावरती डेब्रिज मातीचा भराव करुन समुद्रातील खराब पाणी मिठागर क्षेत्रात येऊ नये म्हणून बांध दुरुस्ती करत असताना या क्षेत्रालगतच असलेले न.भु.क्र.२५५ चे वन विभागाच्या ताब्यात आलेल्या अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्रात सुमारे १० ते १२ ट्रक डेब्रिज माती भराव झाल्याचे दिसून आले आहे.

(२) वनक्षेत्रपाल मध्य मुंबई रें.गु.क्र.ई-०२/२०२२ दि.२१.०४.२०२३ अन्वये श्री.मुरारीलाल नवलराम गारोडिया यांच्या विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) सॉल्ट पॅन विभागाच्या अहवालानुसार, ६० अनधिकृत बांधकामे/झोपड्या हटविण्यात आल्या आहेत, व डेब्रिज हटविण्याचे काम हाती घेण्यात आले होते.
(४) विलंब झालेला नाही.

---

**दक्षिण नागपुरातील भाग्यश्रीनगर, सन्माननगर येथील खुल्या भूखंडावर उभारण्यात आलेल्या उद्यानाची झालेली दुरवस्था**

**(१०) ६४९५० (३१-०८-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण नागपुरातील भाग्यश्रीनगर, सन्माननगर येथे सुमारे १२ ते १५ वर्षांपूर्वी एनआयटीच्या खुल्या भूखंडाच्या सभोवताली संरक्षण भिंत बांधून उभारण्यात आलेल्या उद्यानाची सद्यस्थितीत अत्यंत दयनीय अवस्था झाली असल्याची बाब दिनांक ३१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू उद्यानात पाणी, शौचालय, साफसफाई, योगाशेड, आसनव्यवस्था यांसारख्या मुलभूत सुविधांची देखील वानवा भासत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त उद्यानाची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि सदरहू उद्यानाच्या नूतनीकरणाचे काम तातडीने हाती घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे अंशतः खरे आहे.
या ठिकाणी लहान मुलांची खेळणी, ग्रीन जिम, पाय वाट, बेंचेस व योग शेडची व्यवस्था करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ शहरातील नगरपालिका प्रशासनातील अग्निशमन यंत्रणेकडे हायड्रोलिक सिस्टिमचा अग्निशमन बंब नसल्याबाबत**

**(११) ६५१३५ (२५-०८-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगाव) शहरात महानगरपालिकेकडून सहा मजली इमारत बांधकामाना मंजुरी देण्यात येत असताना एखादी दुर्घटना घडल्यास अग्निशमन यंत्रणेकडे हायड्रोलिक सिस्टिमचा अग्निशमन बंब नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील शाळा, महाविद्यालय, हॉस्पिटल, रहिवाशी सदनिका मधील अग्नी सुरक्षेचा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अग्निशमन दल सक्षम करण्यासाठी नगरपालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) भुसावळ नगरपरिषदेद्वारे अग्निसुरक्षेबाबत उपाययोजना करण्यात येत आहे.
भुसावळ नगरपरिषदेस माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये प्रशिक्षित अग्निशमन अधिकारी गट-ब चे संवर्ग कर्मचारी उपलब्ध झाले आहेत. त्यानुसार भुसावळ शहरातील शाळा, महाविद्यालय, हॉस्पिटल इत्यादी आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून, त्यांना अग्निशमन यंत्रणा बसविण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक व

जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ (सन २००७ चा महा.३) नुसार आग प्रतिबंधक उपाययोजना करण्याबाबत जाहीर सूचना/प्रसिद्धी पत्रकाद्वारे आवाहन करण्यात आले आहे. याशिवाय वेळोवेळी अग्निशमन विभागाशी संबंधित प्रशिक्षणही देण्यात येते.

भुसावळ नगरपरिषदेकडे सद्यस्थितीत २ अग्निशमन वाहने कार्यरत आहेत. भुसावळ नगरपरिषदेकरीता हायड्रोलिक सिस्टीमचा अग्निशमन बंब खरेदी करण्यास तांत्रिक मान्यता मिळण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील बांद्रा-कुर्ला संकुल ते सी.एस.टी रोड यांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१२) ६५९७२ (२५-०८-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील बांद्रा-कुर्ला संकुल ते सी.एस.टी रोड यांना जोडणाऱ्या प्रस्तावित ३० मी रुंद रस्त्याचे काम प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सांताक्रुझ-चेंबुर लिंक रोडपासून पश्चिम द्रुतगती मार्गापर्यंत रस्ता रुंदीकरण, उड्डाणपुलाचे काम युध्द पातळीवर सुरु असून या कामामुळे सांताक्रुझ-चेंबुर लिंक रोड, कपाडीया नगर, सी.एस.टी. मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम तातडीने झाल्यास वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असून, वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी व त्यानंतर अनेकवेळा मा.मंत्री महोदय, आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई व संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त रस्त्याचे काम तातडीने हाती घेऊन वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. सदर रस्त्याचे ९० टक्के काम पूर्ण करण्यात आले व उर्वरित सी.एस.टी. ला जोडण्यात येणा-या जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याचे व जमीन अधिग्रहण प्रक्रीया सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर संपादित जमिनीवर असलेल्या अतिक्रमण धारकांना वितरणपत्र देऊन सुध्दा अद्यापपर्यंत स्थलांतरीत झालेले नाहीत व तसेच मे. ए. एच. वाडीया ट्रस्ट यांना जमिन अधिग्रहणाबाबत सुनावणीसाठी कळविण्यात आले आहे व उप संचालक, नगर रचना, बृहन्मुंबईपालिका, यांच्याकडून सदर क्षेत्राचे मुल्यांकन अहवालासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. जमिन अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण होताच व अतिक्रमणे हटविताच उर्वरीत लांबीतील रस्त्याचे काम पूर्ण करून सदर रस्ता हा वाहतूकीसाठी अतिशीघ्र खुला करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरातील मध्यवर्ती बस स्थानक ते राजारामपुरी या मार्गावरील रेल्वे फाटकावरील पादचारी पुलाच्या बांधकामाबाबत

**(१३) ६७३५५ (३०-०८-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील मध्यवर्ती बस स्थानक ते राजारामपुरी या मार्गावरील रेल्वे फाटकावरील पादचारी उड्डाणपुलाच्या मुदतवाढीचा प्रस्ताव दिनांक ३० ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास सादर केला आहे हे खरे आहे

काय,

(२) असल्यास, उपरोक्त पूलासाठी रुपये १ कोटी ८५ लक्ष निधीची आवश्यकता असून स्थानिक महानगरपालिका ३० टक्के व राज्यशासन ७० टक्के हिस्सा देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सदर प्रस्तावाच्या रेखाचित्रास रेल्वे प्रशासनाने मान्यता दिली नसून राज्य शासनाने ही आपला निधीचा हिस्सा अद्याप दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचा पूल तातडीने उभारण्यासाठी स्थानिक प्रशासन, रेल्वे प्रशासन व शासनाने कोणती कार्यवाही केली त्यानुसार पुलाचे काम किती दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) कोल्हापूर शहरातील मध्यवर्ती बस स्थानक ते राजारामपुरी या मार्गावरील रेल्वे फाटकावरील पादचारी उड्डाणपुल बांधणे या कामास रेल्वे प्रशासनाने दि.०३/०८/२०२३ रोजी मंजूरी दिली आहे. सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार या कामासाठी रु.३.८८ कोटी इतक्या रकमेचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) या योजनेअंतर्गत दि.३०/११/२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार या कामाची निविदा प्रक्रिया महानगरपालिकेकडून करण्यात आली असून काम पूर्ण करण्याची मुदत १५ महिने आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील राज्य महामार्ग-७६ वरील भिवंडी विश्व भारती फाटा ते वडपा जंक्शन व राज्य महामार्ग-८४ वरील भिनार ते निबवलीरस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) ६८४२२ (३१-०८-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील राज्य महामार्ग-७६ वरील भिवंडी विश्व भारती फाटा ते वडपा जंक्शन व राज्य महामार्ग-८४ वरील भिनार ते निबवली अशा ७.७०० कि.मी.लांबीच्या बायपास महामार्गाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम पूर्ण करण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विश्वभारती फाटा ते भिनार-वडपे रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर रस्ता दि.२५/०५/२०२१ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कार्यान्वित संस्था म्हणून पुढील कार्यवाही साठी हस्तातरीत केलेला आहे. सदर ७.७०० कि.मी. लांबीपैकी सुमारे ३.०० कि.मी. रस्त्याचे कॉक्रिटीकरण हे उपलब्ध जागेत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

दि.२५/०४/२०२३ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सल्लागाराची नेमणूक केली असून उर्वरित मंजूर प्रादेशिक आराखड्यानुसार प्राधिकरणामार्फत बांधकाम करणेबाबतची पुढ़ील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साक्रीगाव (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथे कोळशाच्या खाणीत उत्खन्नाच्या कामात स्थानिक नागरीकांना प्राधान्य देण्याबाबत**

**(१५) ६९०१२ (२९-०८-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साक्रीगाव (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथे कोळशाच्या खाणीत उत्खन्नाचे काम सुरु करण्याचे कंत्राट एका कंपनीला देण्यात आले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन नियमानुसार उक्त कामासाठी स्थानिक नागरीकांना प्राधान्य देण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०५-२०२४) :** (१) उपक्षेत्रीय प्रबंधक, पोवणी उपक्षेत्र, मे.वेस्टन कोल फिल्ड लि. बल्लापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, मौजा साखरी, ता.राजुरा येथील पोवनी-२ एक्स, ओपन कास्ट खाणीमध्ये उत्खननाचे काम M/s.HCPL-SHPPL JV या कंत्राटदार कंपनीला माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये देण्यात आले आहे.
(२) अशाप्रकारच्या मागणीची निवेदने स्थानिक प्रशासनाकडे प्राप्त झालेली नाहीत.
(३) व (४) विषयाधीन प्रकरणातील कंत्राटदार कंपनीमध्ये, कार्यरत ३३० कर्मचाऱ्यांपैकी स्थानिक-२२६ इतकी असून, परप्रांतीय कामगारांची संख्या १०४ इतकी आहे.

---

**ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो ५ चा मार्ग उल्हासनगर पर्यंत वाढविण्याबाबत सल्लागार नियुक्ती करण्याबाबत**

**(१६) ६९३७४ (२७-०८-२०२३). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो मार्गिका ५ चा विस्तार उल्हासनगर पर्यंत वाढविण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली असून शासनाने दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १५४ व्या बैठकीत उल्हासनगर पर्यंत मेट्रो ५ चा मार्ग उल्हासनगर पर्यंत वाढविण्यात येणार असून यासाठी सल्लागार नियुक्त करण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेट्रो मार्ग ५ ठाणे-भिवंडी-कल्याण या प्रकल्पाचा विस्तार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे खडकपाडा टप्पा क्र १ आणि उल्हासनगर पर्यंत टप्पा क्र. २ मध्ये करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उल्हासनगर पर्यंत सदर प्रकल्पाची अंमलबजावणी योग्य त्या ट्रान्सीट सिस्टिमद्वारे तात्काळ करण्याकरिता सदर मार्गाचा विस्तार प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्त करण्यात येईल असे आश्वासन

लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी दिलेल्या पत्रात दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उल्हासनगर पर्यंत असलेला टप्पा क्र.२ चा DPR प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्ती करुन सदरचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे,
(४) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्त करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे आणि बोरिवलीला जोडणाऱ्या दुहेरी बोगद्याच्या प्रकल्पाबाबत

**(१७) ६९८१३ (०४-०९-२०२३). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे आणि बोरिवलीला सध्या रस्त्याने प्रवास करताना मागाठाणे ते टिकूजीची वाडी हे २४ किमीचे अंतर पार करण्यासाठी एका तासांहून जास्त वेळ लागत असून रहदारीची मोठ्या प्रमाणावर कोंडी होत असल्याने, ठाणे आणि बोरिवलीला जोडणाऱ्या दुहेरी बोगद्याच्या प्रकल्पासंदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाच्या कामाची सद्यः स्थिती काय आहे,
(४) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे कामास प्रत्यक्षात केव्हापासून सुरुवात होणार असून, किती कालावधीत हा प्रकल्प पुर्णत्वास येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रस्तावित २ + २ मार्गिका बोगद्याची ठळक माहिती खालीलप्रमाणे:
एकूण लांबी ११.८० कि.मी. (बोगद्याची एकूण लांबी १०.२५ कि.मी. व जोडरस्त्याची लांबी १.५५ कि.मी. आहे.)
बोगद्याचा बाह्य व्यास : १३.०५ मी प्रत्येकी २ मार्गिकेचा असे २ बोगदे.)
प्रत्येक ३०० मी. येथे आंतरजोड मार्गिका ( cross connection ) असेल.
अग्निशमन यंत्र, पाण्याची नाळी, धुरांचे डिटेक्टर, प्रकाशित प्रतिबिंब (LED Light sign boards) योग्य ठिकाणी स्थापित केले जातील.
(३) प्राधिकरणाच्या दिनांक १० मार्च, २०२३ रोजी झालेल्या १५४ व्या बैठकीत या प्रकल्पाला रु. १६६००.४० कोटी किमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून दिनांक ०४ मे, २०२३ रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २७५व्या बैठकीत पॅकेज-१ व पॅकेज-२ याकरीता कंत्राटदार M/s Megha Engineering & Infrastructures Ltd (MEIL) यांचा लघुत्तम देकार (Including Provisional Sum but excluding GST) स्विकारण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली आहे. वन विभागाची परवानगी व भुसंपादनाचे काम प्रगती पथावर आहे.
(४) प्रकल्पाचे बांधकाम पुढील पाच वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड (जि.पुणे) तालुक्यात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) अंतर्गत येणाऱ्या गावांसाठी अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१८) ७०१६७ (३१-०८-२०२३). अ‍ॅड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील सुमारे ५१ महसुली गावांचा समावेश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) अंतर्गत झाला असून, या सर्व गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकीकरण व औद्योगिकीकरण वाढल्यामुळे या ठिकाणी गावांमध्ये आग लागण्याच्या घटनांमध्ये देखील वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) अंतर्गत यवत गावाचा समावेश शहरी विकास केंद्र म्हणून करण्यात आला असून, राहू या गावाचा समावेश ग्रामीण विकास केंद्र म्हणून करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आग लागल्यानंतर कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतून अग्निशमन यंत्रणा पोहचेपर्यंत मोठे नुकसान होत असल्यामुळे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करून देण्याबाबत येथील नागरिकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त गावांकरिता अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सन २०१८ पासून प्राधिकरणाची अग्निशमन सेवा कार्यान्वित झाल्यापासून ता. दौंड, जि. पुणे येथे विविध १५ ठिकाणी आगीच्या घटना घडल्याची नोंद आहे.

(२) होय, हे खरे आहे.

यवत व केडगाव या गावांचा समावेश शहरी विकास केंद्र व राहू या गावाचा समावेश ग्रामीण विकास केंद्र करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) उपरोक्त नमुद विकास केंद्रामध्ये अग्निशमन केंद्रासाठीचे आरक्षण खालीलप्रमाणे प्रस्तावित आहे.

* यवत-आरक्षण क्र. FS-४,०.३८ हेक्टर क्षेत्र गट नं.८२८.
* केडगाव-आरक्षण क्र. FS-४,०.३९ हेक्टर क्षेत्र गट नं.११८.
*राहू-आरक्षण क्र. FS-११, ०.४० हेक्टर क्षेत्र, गट नं.१४७४.

मौजे-केडगाव या ठिकाणी अग्निशमन केंद्र उभारणीसाठी मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे जागा मागणीबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगर प्रदेश प्राधिकरणांतर्गत होत असलेल्या विकास कामांना गती मिळण्याबाबत**

**(१९) ७०१७४ (३१-०८-२०२३). अ‍ॅड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकारणाला आठ वर्ष पूर्ण झाली असूनही मेट्रो, रिंगरोड व टीपी स्कीम यासारखे नियोजनबध्द विकास व शाश्वत रोजगार मिळवून देणारे प्रकल्प अद्याप पूर्ण झाले नसल्याचे माहे, एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये जिल्ह्यातील सुमारे ८०० हून अधिक गावांचा समावेश झाला असून, त्यामध्ये देखील विकासकामे करण्यासाठी त्याप्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याकरिता नियुक्त अधिकाऱ्यांना पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा आवाका समजण्यास एक ते दोन वर्षाचा कालावधी लागत असून वारंवार बदल्या होत असल्यामुळे त्याकामांना गती मिळत नाही, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, विकासकामांसाठी परकीय व स्वदेशी गुंतवणूक न करणे, विविध प्रकल्पांचे काम करण्यासाठी अधिकाऱ्यांची इच्छाशक्ती नसणे तसेच तांत्रिकदृष्टया अनुभवी अधिकाऱ्यांची कमतरता असणे या बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातंर्गत होत असलेली विकास कामे अधिक गतीमान होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कार्यान्वित ६ नगर रचना योजनांचे कामकाज सुरु आहे. तसेच माण-हिंजवडी ते शिवाजीनगर पुणे मेट्रो लाईन-३ प्रकल्प नियोजित वेळेमध्ये पूर्ण करण्याच्या दृष्टीने काम प्रगतीपथावर असून सद्यस्थितीत ३८.९२% काम पूर्ण झाले आहे. प्राधिकरणाकडील ११० मी. रुंद रिंगरोडच्या एकूण १२८.०८ किमी लांबीपैकी ४० किमी लांबी विकसनासाठी MSRDC कडे हस्तांतर करण्यात आला आहे. शासनाच्या दि.१८.११.२०२१ रोजीच्या अधिसूचनेस अनुसरुन सदर ६५ मी. रुंदीनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल व भूसंपादन प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(२) हे खरे नाही.
म्हाळुंगे-माण नगर रचना योजना क्र.१ साठी दि.१८.०५.२०१८ रोजी प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पास रु.६१६.९० कोटी इतक्या रक्कमेस मंजुरी देण्यात आली आहे. सन २०२३-२४ मध्ये नगर रचना योजना क्र.१ ते ६ साठी २७५ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मंजुर आराखड्यानुसार प्रतिनियुक्तीने अनुभवी तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी उपलब्ध करुन देण्यात येतात.
(५) विकास कामे अधिक गतिमान होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या प्रकल्पांकरिता तज्ञ व अनुभवी सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच GIS आधारित तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असुन त्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. यामुळे वेळेची बचत होवुन कामाची अचुकता वाढली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील वडाळा ते कासारवडवाली मेट्रो ४ च्या कामाबाबत

**(२०) ७१४८८ (१२-०९-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वडाळा ते कासारवडवाली मेट्रो ४ चे काम मुलुंड विभागातून जात असून गत वर्षभरापासून काम जलद गतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मार्गावर आतापर्यंत किती टक्के काम पूर्ण झाले असून उर्वीरत काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मुलुंड विभागात सोनापूर सिग्नलपासून मुलुंड चेकनाक्यापर्यंत मेट्रो मार्गाची एकुण लांबी २.७७ कि.मी. आहे. त्यापैकी सरासरी सुमारे ६५% इतके काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे वेगाने पूर्ण होण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ आणि यंत्रसाम्रगी नियुक्त करुन सदर काम वेळेत पूर्ण करण्याचा शासनाचा मानस आहे.

---

**लक्षतिर्थ वसाहत ते मसोबा मंदिर शिंगनापुर रोड, कोल्हापूर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत**

**(२१) ७१५१७ (०४-०९-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लक्षतिर्थ वसाहत ते मसोबा मंदिर शिंगनापुर रोड, कोल्हापूर येथील महानगरपालिका विकास नियोजन आराखड्यानुसार बांधण्यात आलेल्या ४० फुटी रस्त्याचे डांबरीकरण रस्ता बांधल्यापासून अद्यापपर्यंत झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता खराब होत असल्याने त्या रस्त्यावर अतिक्रमण वाढत जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महानगरपालिकेतर्फे विकास नियोजन आराखड्याचे काम मागील २ वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील लक्षतिर्थ वसाहत ते मसोबा मंदिर शिंगनापुर हा पाणंद रस्ता असून तो महानगरपालिकेच्या ताब्यात नाही. त्यामुळे सदर रस्त्यावर डांबरीकरण करता आले नाही, ही वस्तूस्थिती आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) कोल्हापूर शहराची तिसरी विकास योजना तयार करण्याच्या अनुषंगाने एजन्सी नियुक्त करण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. उपसंचालक, विकास योजना विशेष घटक यांनी सूचित केलेल्या काही अटी शर्तीचा समावेश करुन संबधितांना कार्यारंभ आदेश दिल्यानंतर सदरचे काम सुरु करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांची थकित असलेली देणी त्वरीत अदा करण्याबाबत**

**(२२) ७१८२१ (१७-०२-२०२४). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन मागील पाच वर्षापासून देण्यात आलेले नसणे, महागाई भत्ता, वैद्यकीय, रजा प्रवास, शैक्षणिक इ. सेवांची सुमारे १७० कोटींची थकित देणी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याप्रकरणी कर्मचारी संघटनांनी मा.मुख्यमंत्री व आयुक्त, ठाणे महापानगरलिका यांचेकडे दिनांक १४ आक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केलेली आहे काय, त्यानुसार महानगरपालिका परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांची वर्षानुवर्षे थकित असलेली देणी त्वरीत अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२४) :** (१), (२) व (३) अशा प्रकारचे निवेदन महानगरपालिका स्तरावर प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, ठाणे महानगरपालिकेकडून ठाणे परिवहन उपक्रमातील सेवा निवृत्त ८१ कर्मचाऱ्यांची उपदानाची देयके व रजा वेतनाची ६३ कर्मचाऱ्यांची थकीत देयके अदा करण्यात आली आहेत. तसेच कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता फरकापोटी देय असलेली रक्कम माहे नोव्हेंबर, २०२३ पासून अदा करण्यात आली असून, माहे फेब्रुवारी, २०१७ ते जुलै, २०१७ या कालावधीतील थकबाकी फेब्रुवारी, २०२४ मध्ये अदा करण्यात आली असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलादपूर (जि.रायगड) येथील स्थानिकांना विस्तारित नळपाणी पुरवठा योजनेद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(२३) ७१९८७ (१५-०२-२०२४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलादपूर (जि.रायगड) शहराच्या विस्तारीत नळपाणीपुरवठा योजनेचे दिनांक १७ फेब्रुवारी, २००९ रोजी तत्कालीन पालकमंत्री यांनी भूमीपूजन करूनही आजतागायत उक्त नळपाणीपुरवठा योजना शहरात स्थापित झाली नसल्याने घरोघरी खासगी बोअरवेलच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलादपूर शहरामध्ये आजमितीस ८५० हून अधिक बोअरवेल असून, याबाबत पोलादपूर नगरपंचायतीने कोणतेही अधिकृत सर्व्हेक्षण केले नसल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलादपूर शहराच्या विस्तारीत नळपाणी पुरवठा योजनेसाठी लाखो रुपये खर्च करुनही ही योजना कार्यान्वित झालेली नाही , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने या विस्तारीत नळपाणीपुरवठा योजनेद्वारे पोलादपूर वासियांना सुरळीत व शासनाने निश्चित केलेल्या प्रमाणात दररोज पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०४-२०२४) :** (१) भारत निर्माण योजनेअंतर्गत तत्कालिन पोलादपूर ग्रामपंचायतीकरीता नळपाणी पुरवठा योजनेस सन २००८-०९ या आर्थिक वर्षात मंजूरी प्राप्त झाली होती. त्यानुसार योजनेची कार्यवाही व अंमलबजावणी ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांचेमार्फत करण्यात असून सदर योजना उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, रायगड जिल्हा परिषद, उपविभाग, पोलादपूर यांच्या अखत्यारीतील आहे. नळ पाणीपुरवठा योजना अस्तित्वात आल्यापासून शहरात नियमितपणे पाणीपुरवठा सुरु असल्याने खाजगी बोअरवेलच्या संख्येमध्ये वाढ झालेली नाही.
(२) पोलादपूर नगरपंचायत हद्दीत साधारणत: २०० ते २५० बोअरवेल असून मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे नगरपंचायतीमार्फत अधिकृत सर्वेक्षण केलेले नाही.
(३) व (४) तत्कालिन पोलादपूर ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर झाल्यानंतर शहरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे सर्वसाधारण सभेमध्ये अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेमार्फत पाणीपुरवठा करण्याबाबत, तसेच योजनेची देखभाल दुरुस्ती नगरपंचायतीमार्फत करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार नगरपंचायत क्षेत्रात नळ पाणीपुरवठा योजनेमधून १०४७ घरांना दररोज नियमितपणे पाणीपुरवठा केला जात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावर जाहिरात प्रसिद्ध करतांना नियमांचा भंग करुन निविदा प्रक्रिया राबविल्याबाबत

**(२४) ७२२८१ (०८-०२-२०२४). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावर जाहिरात फलक, दिशादर्शक फलक, युनिपोल व विद्युत स्तंभावर ग्लोसाईत बोर्ड प्रदर्शित करण्यासाठीच्या महाराष्ट्र महानगरपालिका नियम २०२२ च्या अनुसार परिशिष्ट ५ मधील नियम (ख) व (त्र) आणि नियम (त) व (थ) मधील नियमांचा भंग करुन जाहिरात प्रदर्शित करण्याची निविदा प्रक्रिया अवलंबिण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २७ मे, २०२३ चे पत्रानुसार सदर बाब संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देखील निविदा प्रक्रियेमध्ये कोणताच बदल करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निविदा प्रक्रियेत बदल न केल्यामुळे अपघात प्रवणक्षेत्र निर्माण होऊन नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी झालेली अनियमितता व करण्यात आलेले दुर्लक्ष याबाबत संबंधित महानगरपालिका अधिकारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

जाहिरात फलक, युनिपोल निविदा प्रक्रियाबाबत मा. उच्च न्यायालय मुबई, खंडपिठ नागपुर येथे याचिका क्रमांक ४३३२/२०२३ न्यायप्रविष्ठ असुन मा.उच्च न्यायालयाच्या दि.२९.०८.२०२३ रोजीच्या आदेशानुसार महानगरपालिकेला कार्यरंभ आदेश निर्गमित करण्यास मुभा प्रदान केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

निविदा प्रक्रिया अवलंबितांना दिनांक ९ मे २०२२ रोजीच्या अधिसुचनेतील सर्व नियम तसचे अटी व शर्ती अंतर्भुत करुन निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील कळमना आणि वर्धमाननगरीतील अगरबत्तीचा कारखाना, सायकल आणि फोमच्या गोदामांना लागलेली भीषण आग

**(२५) ७२७१२ (११-०२-२०२४). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील कळमना आणि वर्धमाननगरात लागलेल्या भीषण आगीत अगरबत्तीचा कारखाना, सायकल आणि फोमचे गोदाम जळून खाक झाले असल्याची घटना दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आगीची झळ लगतच्या निवासी वस्त्यांना सोसावी लागली असल्याने व्यापारी पेठेलगतच्या रहिवाश्यांत भीतीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, नागपूर शहरातील बहुतांश व्यापारी पेठेतील दुकाने आणि गोदामांत अग्निसुरक्षा निकषांचे पालन केले जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसान नागपूर शहरातील दुकाने आणि गोदामांच्या आगीच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना हाती घेतल्या वा घेण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२४) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.
सदर आगीच्या घटना दि. ०६ ऑक्टोबर, २०२३ रोजी घडलेल्या आहेत.
(३) हे अंशतः खरे आहे.
महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील अनुसूची १ मधील वर्गीकृत विविध इमारतींसाठी विनिर्दिष्ट केलेल्या उपाययोजनांप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.
त्याअनुषंगाने शहरात अस्तित्वात तथा वापरात असलेल्या विविध प्रकारच्या इमारतीमध्ये ज्यांनी अधिनियमाच्या तरतुदीनुसार किमान अग्निशमन उपाययोजनांची पुर्तता केलेली नाही अश्या एकूण १८४८ विविध प्रकारच्या इमारतीवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारीत अधिनियम २०२३ च्या विविध कलमाअंतर्गत कारवाई करण्यात आली असून त्याबाबत अनुषंगिक कार्यवाही सुरु आहे.
(४) नाही,
परंतु, अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागामार्फत शहरामध्ये अग्निशमन उपाययोजनांची पुर्तता न करणा-या विविध प्रकारच्या इमारती, व्यवसायीक प्रतिष्ठाने (दुकाने) आणि गोदामांच्या आगीच्या घटनांना आळा घालण्याकरीता यांच्या विरुध्द आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व सुधारीत अधिनियम २०२३ च्या विविध कलमाअंतर्गत कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे येथील जिता रुग्णालयील मृत्यु झाल्यानंतर देयक अदा केले नसल्यामुळे मृतदेह ताब्यात दिला नसल्याबाबत

**(२६) ७३३१७ (१६-०२-२०२४). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील जितो रुग्णालयासोबत ठाणे महानगरपालिकेने रुग्णसेवेच्या केलेल्या करारासंदर्भात ठाणे महानगरपालिकेतून मुख्य माळी म्हणून सेवानिवृत्त झालेले श्री.अशोक बोबडे यांना उपचारासाठी दाखल केले असता त्यांचा मृत्यू झाल्यानंतर रुग्णालयाने देयक अदा केल्याशिवाय मृतदेह ताब्यात देणार नाही म्हणून तब्बल १३ तास मृतदेह ताब्यात दिला नसल्याचे दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२४) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार श्री.अशोक बोबडे यांना हायपरटेंशन, ह्दयरोग इ. आजाराच्या पार्श्वभूमीवर दिनांक ०१.०८.२०२३ रोजी जितो हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले होते. उक्त रुग्णाचा मृत्यू दिनांक १४.०८.२०२३ रोजी सकाळी १.३५ वाजता झाला असून त्यांच्या नातेवाईकांनी रुग्णालयास विनंती केल्यानुसार जितो रुग्णालयाने श्री. बोबडे यांच्या उपचाराचे रुपये १,१०,०००/- इतके देयक न घेता, त्यांचा पार्थिव सायंकाळी ०४.२५ वाजता त्यांच्या नातेवाईकांना दिला आहे.

दरम्यान सबंधित रुग्णालयामध्ये बिल थकविल्यामुळे मृतदेह अडकवला अशा आशयाचे वृत्त प्रसिध्द झाले होते ही वस्तुस्थिती आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरा भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील खाडी किनारी वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांना वीज पुरवठा करणेबाबत**

**(२७) ७३३४९ (०८-०२-२०२४). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन, चौक, तारोडी, पाली, भाईंदर पूर्व येथील नवघर गाव हि गावे समुद्र व खाडी किना-यावर वसलेली असल्यामुळे सागरी क्षेत्र नियंत्रात येत असल्याने सदर गावांना वर्षानुवर्षे वीज पुरवठा करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावातील रहिवाश्यांना वीज पुरवठा व्हावा याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी मा. राज्यमंत्री, पर्यावरण विभाग यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उत्तन, चौक, तारोडी, पाली, भाईंदर पूर्व येथील नवघर गाव या गावातील रहिवाश्यांना वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावरील कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०४-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे. अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लि. व मे.टाटा पॉवर लि. कंपनी यांच्यामार्फत विद्युत पुरवठा करण्यात येतो. विज पुरवठा करणारे क्षेत्र सागरी/CRZ बाधीत क्षेत्रात येत असल्यास सदर कंपनीमार्फत पर्यावरण विभागाच्या आवश्यक परवानग्या घेऊन विज पुरवठा केला जातो.

---

**डायघर (जि.ठाणे) येथे घनकचरा प्रकल्प उभारणीचे कामास नागरिकांच्या होत असलेल्या विरोधाबाबत**

**(२८) ७३८४७ (१७-०२-२०२४). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेचा कचरा प्रश्न गुंतागुंतीचा होत असून भंडार्लीनंतर डायघर मध्ये नवीन डंम्पिंग प्रकल्प ठाणे महानगरपालिका प्रशासनामार्फत कार्यान्वित करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाचा कोणताही कचरा प्रक्रिया प्रकल्प यशस्वीपणे कार्यान्वित होत नसून सदर प्रकल्प परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हिताचा नसल्यामुळे डायघर तसेच आजूबाजूच्या देसाई, शिळ, पडले गावांमध्येही सदर कचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या विरोधात ग्रामस्थांनी अनेक बैठकी केल्या असून डायघर मध्ये कोणत्याही परिस्थितीत डंम्पिंग होऊ देणार नाही असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, डायघर येथे ग्रामस्थांचा वाढता विरोध बघता प्रशासनाने सदर प्रकल्प अन्यत्र स्थलांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२४) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार मौजे भंडार्ली येथे तात्पुरत्या स्वरुपात सुरू करण्यात आलेले घनकचरा प्रक्रिया केंद्र बंद करण्यात आले असून सद्यस्थितीत मौजे डायघर येथे घनकचरा पूर्व प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात आले आहे.

तसेच मौजे डायघर येथे घनकचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरिता पूर्व प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात आले असून तेथे कचऱ्याचे डंम्पिंग केले जात नाही. उक्त प्रकल्पाविषयी आजुबाजुच्या गावातील ग्रामस्थांना अवगत

करण्यात आली आहे. उक्त ठिकाणी दुर्गंधी / रोगराई / आजार पसरणार नाही याबाबतची दक्षता घेण्यात येत असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह जयंती दि.९ मे रोजी जन्म तारखेनुसार साजरी करणेबाबत**

**(२९) ७३९०९ (०८-०२-२०२४). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह जयंती दिनांक ९ मे रोजी जन्म तारखेनुसार साजरी करणेबाबत अप्पर मुख्य सचिव (सा.प्र.वि.), मंत्रालय यांना दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्ताव सादर करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०४-२०२४) :** (१) होय.
(२) वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची जयंती ज्येष्ठ शुक्ल तृतीया या तिथीनुसार साजरी करण्याबाबत दिनांक १०.०५.२००६ च्या शासन निर्णयानुसार धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे आता ०९ मे या इंग्रजी महिना व दिवसानुसार जयंती साजरी करणे उचित होणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी शहर महानगरपालिकेतील सफाई कामगार, सेवानिवृत्त कर्मचारी यांचे तीन महिन्याच वेतन थकीत असल्याबाबत**

**(३०) ७४०४२ (१७-०२-२०२४). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहर महानगरपालिकेतील सफाई कामगार, सेवानिवृत्त कर्मचारी यांचे तीन महिन्याचे थकीत वेतन तात्काळ देण्यात यावे, स्वच्छतेच्या कामाव्यतिरिक्त तांत्रिक कामे देण्यात येऊ नये यासही विविध मागण्यांसाठी नगरपरिषद, नगरपंचायत, संवर्ग कर्मचारी संघटना, परभणी शहर महानगरपालिका सफाई कामगार व कर्मचारी संघटनेतर्फे दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास धरणे आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सफाई कर्मचाऱ्यांची थकीत वेतन वितरीत करण्याबाबत तसेच भविष्यात या कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही,
महानगरपालिकेने कळविल्यानुसार नगर परिषद, नगर पंचायत, संवर्ग कर्मचारी संघटना, परभणी शहर महानगरपालिका सफाई कामगार व कर्मचारी संघटनेतर्फे दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी पासून कोणतेही धरणे आंदोलन सुरू नव्हते.
(२) परभणी शहर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन व बांधील खर्च दरमहा अंदाजे रुपये ६.७२ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे,
याकरिता महानगरपालिकेचे एकूण उत्पन्न कमी पडत असल्याने आज पावेतो महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांचे २ महिन्याचे व उर्वरित कर्मचाऱ्यांचे ३ महिन्याचे वेतन थकीत आहे.
(३) महानगरपालिकेने शासनाकडून मिळणाऱ्या वस्तू व सेवा कर अनुदानामध्ये वाढीव रक्कम देणेबाबतची मागणी केली

आहे. याअनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे,
याबाबत उत्पन्न स्त्रोत व मालमत्ता कर वसुलीत वाढ करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) नगरपरिषदेचे 'विशेष आर्थिक लेखापरीक्षण' करण्याबाबत**

**(३१) ७४०६९ (१७-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि. बीड) नगरपरिषद मध्ये मोठ्या प्रमाणात कामे न करता देयके उचलणे, ई-टेंडरिंग न करणे व आर्थिक अनियमितता करत विविध कामांत शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबाजोगाई नगर परिषदेचे सन २००१ ते २०२१ या कालावधीतील 'विशेष आर्थिक लेखापरीक्षण' करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी मा.लोकप्रतिनिधींचे दि.१८ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे निवेदन विभागास दि.१७ नोव्हेंबर, २०२३ रोजी प्राप्त झाले आहे. त्यानुषगाने तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना दि.२२ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.२८ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या आदेशान्वये उप विभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली असून, कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्राच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत**

**(३२) ७४७३३ (१७-०२-२०२४). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्राचे नूतनीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास या केंद्राचा उद्घाटन सोहळा पार पडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्घाटना दिवशीच केंद्रातील सुमारे १२ हजार रुपये किंमतीच्या खुर्च्या मोडल्या, त्यानंतर दोन दिवसांनी जादूच्या प्रयोगाचा कार्यक्रम सुरू असताना छताची फळी रंगमंचासमोर कोसळली, त्यानंतर काही दिवसांनी केंद्राच्या छतावरील पत्रे गंजलेले असल्याचे आणि त्यामुळे त्यावर प्लास्टीक कापड टाकण्यात आल्याची बाब निदर्शनास आली, तर ऑक्टोबरच्या दुसऱ्या सप्ताहात गायक अजित कडकडे यांच्या कार्यक्रमादरम्यान केंद्रातील वातानुकूलित यंत्रणा बंद पडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सांस्कृतिक केंद्राचे नूतनीकरण करताना कोणकोणती कामे करण्यात आली आणि त्यासाठी एकूण किती निधी खर्च करण्यात आला आहे,
(४) असल्यास, त्यानुषंगाने सदर प्रकरणी शासनाने निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) चिपळूण शहरामध्ये सन २०२१ मध्ये आलेल्या महापूरामुळे नगरपरिषदेच्या इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्राच्या इमारतीची दुरावस्था झाल्यामुळे नाटयगृह साधारणत: दिड वर्षे बंद अवस्थेत होते. त्यामुळे काही खुर्च्यांचे नटबोल्ट सैल झाल्याने ५ ते ६ खुर्च्यांचा काही भाग निखळला होता. नटबोल्ट बदलून खुर्च्या पूर्ववत बसविण्यात आल्या आहेत.

जादुचा कार्यक्रम सुरु असतांना छताची फळी पडलेली नसून कार्यक्रम सुरु नसतांना स्टेजवरील कामाची पाहणी करतांना PVC Sheet वर कामगाराचा पाय अनावधानाने पडल्यामुळे काही भाग पडला होता. त्यानंतर तो दुरुस्त करुन पूर्ववत करण्यात आला आहे.

छतावरील पत्र्याच्या खाली मौल्यवान किंमतीच्या बाबी असल्याने पूर्व खबरदारी म्हणून पावसाळयामध्ये पत्र्यावर प्लास्टिक कापड टाकण्यात आले होते.

माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये आयोजित गायन कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या वीज पुरवठा प्रणालीमधील एक फ्युज गेल्यामुळे श्री-फेजवर चालणारी वातानुकुलित यंत्रणा बंद पडली होती. तसेच संयोजकाने उपलब्ध करुन दिलेला जनरेटर ऐनवेळी सुरु न झाल्यामुळे वातानुकुलित यंत्रणा सुरु होऊ शकली नाही. त्यानंतर वीज कंपनीच्या कर्मचाऱ्यामार्फत फ्युज बदली करुन वातानुकुलित यंत्रणा पुर्ववत करण्यात आली.

नगरपरिषदेने इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्राचे नुतनीकरण करतांना खालीलप्रमाणे कामे केलेली आहेत:-

| अ.क्र. | कामाचा तपशिल | एकूण खर्च |
|---|---|---|
| १. | जनरेटर बसविण्यासाठी आर.सी.सी. प्लॅटफार्म बांधकाम करणे. | रु.५७,९६,४८२/- |
| २. | वातानुकुलित यंत्रणा | रु.१,१८,९५,०४०/- |
| ३. | विद्युतीकरण व इतर कामे | रु.५८,५८,९८५/- |
| ४. | अग्नीशमन यंत्रणेची कामे | रु.४७,०७,७००/- |
| ५. | स्टेज फ्लोअरींग,फायर एक्झीट करीता लोखंडी जीना, पेंटीग कामे | रु.५१,९८,१९८/- |

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-शिवडी ते न्हावाशेवा सागरी सेतूचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३३) ७४८५९ (११-०२-२०२४). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ते नवी मुंबई प्रवास सुकर आणि वेगवान करण्यासाठी एमएमआरडीएने २१.८० कि.मी.च्या शिवडी-न्हावाशेवा सागरी प्रकल्प उभारणीने कामास सन २०१८ मध्ये सुरुवात करण्यात आली असून माहे डिसेंबर, २०२३ पर्यत पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शिवडी-न्हावाशेवा सागरी प्रकल्पाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) सदरहू प्रकल्पाच्या उभारणीच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) सदरहू प्रकल्पाचे काम निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करून प्रत्यक्षात आता हा सागरी सेतू केव्हापासून वाहतुकीसाठी कार्यान्वित होणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई पारबंदर प्रकल्पामध्ये (अटल सेतू) मुंबई शहरातील शिवडी व न्हावा यांना जोडणाऱ्या सुमारे २१.८० किमी लांबीच्या ६ मार्गिकांच्या (३+३ मार्गिका) पुलाचा अंतर्भाव आहे. या पुलाची समुद्रातील लांबी सुमारे १६.५ किमी असून

जमिनीवरील पुलाची लांबी सुमारे ५.५ किमी इतकी आहे. या पुलाला मुंबई शहरातील शिवडी व नवी मुंबईतील शिवाजी नगर व राष्ट्रीय महामार्ग-३४८ वर चिर्ले गावाजवळ आंतरबदल (Interchanges) आहेत. मुंबईकडील बाजूस कोस्टल रोडला शिवडी-वरळी उन्नत मार्गाचे बांधकाम करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे चिर्ले ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गास जोडणारा प्रकल्पही हाती घेण्यात आला आहे.
(३) व (४) दि. १२.०१.२०२४ रोजी मा. पंतप्रधान महोदय यांचे हस्ते सदर प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले असून, सदर प्रकल्प दि. १३.०१.२०२४ रोजी वाहतूकीस खुला करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील मौजे वालीवाली (जि.ठाणे) येथे उभारण्यात येणारे डम्पिंग ग्राउंड रद्द करण्याबाबत**

**(३४) ७५०६२ (१७-०२-२०२४). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील मौजे वालीवाली (जि.ठाणे) येथे कचऱ्यासाठी उभारण्यात येणारे डम्पिंग ग्राउंड रद्द करण्याबाबतची मागणी नागरिकांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,
(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तदनुसार स्थानिक नागरिकांचा विरोध व केलेली आंदोलने तसेच नागरी वस्तीतील डम्पिंग ग्राउंडमुळे नागरिकांच्या जीविताला व आरोग्याला असलेला धोका पाहता हे डम्पिंग ग्राउंड रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०४-२०२४) :** (१) कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील मौजे वालीवली सर्व्हे क्र.१८८ येथील डम्पिंग ग्राऊंड रद्द करण्याची मागणी साई वालीवली येथील ग्रामस्थांनी नगरपरिषदेकडे केली आहे.
(२) व (३) जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेशान्वये मौजे वालीवली सर्व्हे क्र.१८८ येथील जमीन डम्पिंग ग्राऊंड वापराकरीता कुळगांव बदलापूर नगरपरिषदेस देण्यात आली आहे. त्यानुसार नगरपरिषद हद्दीतील घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पध्दतीने व्यवस्थापन व विल्हेवाट लावण्यात येते. माहे एप्रिल, २०२३ मध्ये अंबरनाथ शहरातील कचरा मौजे वालीवली येथील डम्पिंग ग्राऊंडवर टाकला जाणार असल्याबाबत काही वृत्तपत्रात तसेच समाज माध्यमातून बातमी प्रसिध्द झाल्यामुळे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिक यांनी डम्पिंग ग्राऊंड रद्द करण्याची मागणी नगरपरिषदेकडे केली होती. नगरपरिषदेस प्राप्त निवेदने पुढील नियमोचित कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांना पाठविण्यात आली असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) शहरातील सागरी मार्गालगतच्या कांदळवनाच्या निगराणीसाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याबाबत**

**(३५) ७५२०७ (१७-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) शहरातील सागरी मार्गालगतच्या कांदळवनातील भराव, कचरा, प्लास्टिक काढून दोन महिन्याच्या आत परिस्थिती पूर्ववत करण्याचे आदेश पुणे राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदळवनामध्ये कचरा टाकणाऱ्या व्यक्तींना पकडण्यासाठी आणि बेकायदा भराव, कचराफेक रोखण्यासाठी मालवण नगरपालिकेने स्वखर्चाने सीसीटीव्ही यंत्रणा बसवावी असेही आदेशात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने शासनाने याकडे दुर्लक्ष करणाऱ्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) नगरपरिषदेकडून सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी विहीत निविदा प्रक्रिया करुन दि.०६/११/२०२३ रोजी कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आला आहे. त्यानुसार सीसीटीव्ही बसविण्याचे काम पुर्ण करण्यात आले आहे.
कांदळवनामध्ये कचरा टाकणाऱ्या व्यक्ती विरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती महानगरपालिका आरोग्य सेवेत एमबीबीएस डॉक्टरांची नियुक्ती करण्याबाबत

**(३६) ७५३१६ (१६-०२-२०२४). अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावतीमध्ये १० लाख लोकसंख्येच्या शहरात महानगरपालिकेच्या १३ शहरी आरोग्य केंद्रासह ११ आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये एकूण २४ एमबीबीएस डॉक्टरांची आवश्यकता असताना केवळ ७ डॉक्टरच रुग्णांच्या सेवेत कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या विचार करता तज्ज्ञ डॉक्टरांची ही संख्या अपुरी पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून येथील सर्वसामान्यांना उत्तम उपचार मिळावेत यासाठी येथे तज्ज्ञ एमबीबीएस डॉक्टरांची तातडीने नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२४) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.
अमरावती महानगरपालिका अंतर्गत १३ शहरी आरोग्य केंद्र व ११ आरोग्यवर्धिनी केंद्र असून या ठिकाणी प्रत्येकी १ असे २४ एमबीबीएस डॉक्टर्सची पदे NUHM योजने अंतर्गत मंजूर असून सद्या १३ एमबीबीएस डॉक्टर्स कार्यरत आहे.
(शहरी आरोग्य केंन्द्र ८ व ५ आरोग्यवर्धिनी केंद्र)
(३) शहरातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वरील २४ मंजूर पदांपैकी रिक्त ११ पदावर NUHM योजने अंतर्गत तज्ज्ञ एमबीबीएस डॉक्टरांची नियुक्ती करण्याचे अधिकार संचालक आरोग्य सेवा संचालनालय यांचे निर्देशानुसार आयुक्त यांना असुन पदे भरण्यासाठी वेळोवेळी जाहीरात प्रसिध्द करुन रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार शहर महानगरपालिका (जि.पालघर) क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या सर्वधर्मीय स्मशानभूमी / कब्रस्थान / दफनभूमी यांची देखभाल / दुरुस्तीबाबत

**(३७) ७५४४० (१७-०२-२०२४). श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या सर्वधर्मीय स्मशानभूमी/कब्रस्थान/दफनभूमी यांची देखभाल/दुरुस्ती आणि डागडुजी करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या पालघर जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्याने दिनांक ४ फेब्रुवारी, २०२०, दिनांक ३१ मार्च, २०२२, दिनांक १२ जानेवारी, २०२३ व त्यानंतर पुन्हा दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास सविस्तर लेखी निवेदनाद्वारे आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त विषयासंदर्भात प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत कोणता महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला व त्याअनुषंगाने या निर्णयावरील अंमलबजावणीकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२४) :** (१) व (२) अशा प्रकारचे पत्र प्राप्त झाले आहे.
तथापि, विरार पूर्व गोपरचपाडा येथील मुस्लीम समाजाच्या कब्रस्तान / दफनभूमीची दुरुस्ती करण्याबाबत निर्णय दिनांक २१.०३.२०२३ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला असून सदर कब्रस्तान/ दफनभूमीच्या दुरूस्तीकरीता निविदा मागविण्यात आली आहे.
तसेच महानगरपालिका कार्याक्षेत्रातील जास्त वापरात येणा-या एकूण ३२ स्मशानभूमीच्या देखभाली दुरूस्तीकरीता त्रिवार्षीक निविदा मंजूर करण्यात आली असून दिनांक २३.०३.२०२३ रोजी मंजूर ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आला असल्याचे वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार शहर महानगरपालिका (जि.पालघर) क्षेत्रातील विरार (पूर्व) (कारगिल नगर) परिसरात स्वतंत्र जलकुंभ उभारण्याबाबत**

**(३८) ७५४४१ (१७-०२-२०२४). श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विरार (पूर्व) (कारगिल नगर) परिसरातील पिण्याच्या पाण्याची टाकी, फिल्टर प्लांट, सम स्टोरेज इत्यादी बाबींची पूर्तता करून या भागात स्वतंत्र जलकुंभ उभारण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या पालघर जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्याने दिनांक ३० मे, २०२२, दिनांक ४ ऑक्टोबर, २०२२, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ व त्यानंतर पुन्हा दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना आणि त्यानंतर दिनांक १६ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास आयुक्त यांना एका सविस्तर लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी कोणत्या स्वरूपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०४-२०२४) :** (१) व (२) अशा आशयाचे निवेदन महानगरपालिका स्तरावर प्राप्त झाले आहे.
विरार पुर्व, कारगिल नगर येथे २ दश लक्ष लीटर क्षमतेचे जलकुंभ केंद्र शासन पुरस्कृत अमृत १ अभियान अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, उक्त प्रकल्पास स्थानिक नागरिकांनी केलेल्या विरोधामुळे प्रस्तावित जलकुंभासाठी अन्य पर्यायी जागा उपलब्ध झाली आहे. तसेच अमृत २ योजने अंतर्गत सदर नविन जलकुंभ उभारणे प्रस्तावित असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत एमएमआरडीएचे सुरु असलेल्या जलवितरिकांच्या खोदकामामुळे महामार्गालत दगड व माती पसरविण्यात येत असल्याबाबत**

**(३९) ७५९९९ (१५-०२-२०२४). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत असलेल्या धामणी डहाणु –जि.पालघर धरणातून भाईदर आणि वसई–विरार महानगरपालिकेकरीता पाणी वाहून नेण्यासाठी एमएमआरडीएमार्फत सुरु असलेल्या जलवितरिकांच्या खोदकामामुळे महामार्गालगत डोंगर भागातही खोदकाम करण्यात येत असल्याने दगड व माती महामार्गालगत पसरविण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामार्गालगत दगड व माती पसरविण्यात येत असल्याने सेवारस्ते तसेच महामार्गालगत वाहतूक करण्यास धोका निर्माण झाला असून वाहनांची धडक होऊन अपघात देखील वाढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

त्यानुसार सदर माती व दगड तातडीने हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१), (२) व (३) सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, २ टप्प्यांमध्ये राबविण्यात येत असून, टप्पा-१ मध्ये वसई-विरार महानगरपालिकेस व टप्पा-२ मध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिकेस पाणी पुरवठा करण्याचे नियोजित आहे. टप्पा-१ चे काम जवळपास ९७% पूर्ण झाले असून, टप्पा-२ चे ८८% काम पूर्ण झाले आहे.

सुर्या प्रकल्पाच्या टप्पा-२ मधील जलवाहिनी टाकण्यासाठी महामार्गालगत डोंगराळ भागातील उत्खलनात निघालेली दगड/माती त्याच ठिकाणी डोंगरावर पसरविण्यात येत आहे. सदर माती वाहून जावू नये याकरीता डोंगराळ भागात आवश्यक ठिकाणी भूमीगत जलवाहिनी अंथरल्यानंतर RCC संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. त्यामुळे वाहतूकीस कोणताही धोका नाही. ज्या ठिकाणी सेवारस्ते आहेत त्या ठिकाणची उत्खनन केलेली माती काम करतेवेळी जागेच्या कमतरतेमुळे इतर ठिकाणी साठविण्यात येत आहे व जलवाहिनी अंथरल्यानंतर सदर साठविलेल्या मातीनेच जलवाहिनीवर भराव करण्यात येत आहे. जलवाहिनी अंथरण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर सेवारस्ते पूर्ववत करण्याच्या सूचना कंत्राटदारांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कौसा मुंब्रा (जि.ठाणे) येथे रुग्णालय उभारण्याबाबत**

**(४०) ७६०५२ (१७-०२-२०२४). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौसा मुंब्रा (जि.ठाणे) येथे नागरिकांच्या आरोग्याचे हित लक्षात घेऊन १५ वर्षांपूर्वी १०० खाटांच्या रुग्णालयाची योजना सुरू करूनही आजतागायत सदर ठिकाणी रुग्णालयाचे बांधकाम व रुग्णालय पूर्णपणे कार्यान्वित झालेले नसल्याने या रुग्णालयाच्या बाबतीत ठाणे महानगरपालिकेची उदासीनता स्पष्ट दिसत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने दिनांक १७ सप्टेंबर, २००८ रोजी रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये कार्यादेश देण्यात आला, त्यामुळे पावसाळा वगळता २४ महिन्यात बांधकाम पूर्ण होणे आवश्यक असतांना आजही सदरहू रुग्णालय पूर्णपणे सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कौसा मुंब्रामध्ये खूप मोठी लोकवस्ती असून सदर ठिकाणी एक आरोग्य केंद्र व सुमारे १२ किलोमिटर अंतरावर नजीकचे रुग्णालय असल्याने रहदारीच्या वेळेत तेथे रुग्णाला पोहोचण्याकरीता एक तासापेक्षा अधिक कालावधी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन कौसा मुंब्रा येथे रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२४) :** (१), (२), (३) व (४) मौजे कौसा येथे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे विस्तारीत केंद्र म्हणून स्वातंत्र्य सैनिक हकीम अजमल खान रुग्णालय स्थापित करण्यात येत आहे. सदर रुग्णालयाची इमारत बांधून पूर्ण झाली असून सदर बांधकामास दिनांक ०५.१२.२०२२ रोजी वापर परवाना देण्यात आला आहे. तसेच सदर रुग्णालयाची इमारत PPP तत्वावर रुग्णालय कार्यान्वित करण्यासाठी निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आलेली आहे असे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, रुग्णालय चालविण्याबाबत कार्यादेश देऊन सदर रुग्णालय पूर्णपणे कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) शहरातील वस्त्रोद्योगाच्या कारखान्यांना व कामगारांना नागरी सुविधेसाठी निधी मिळण्याबाबत

**(४१) ७६२१३ (१७-०२-२०२४). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहर वस्त्रोद्योगासाठी तसेच हातमाग आणि यंत्रमाग व्यवसायामुळे पॉवरलुम शहर म्हणून ओळखले जाते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भिवंडी शहरामध्ये मोठ्या प्रमाणात ३० ते ३५ हजार कामगार स्थलांतरित व अस्थलांतरित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्यावतीने पाणी, वीज, ड्रेनेज, रस्ते, स्ट्रीटलाईट, एस.टी.पी प्लॅन, इ. मुलभूत नागरी सुविधांचा अभाव असल्याने व्यावसायिकांना व कामगारांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भिवंडीमध्ये वस्त्रोद्योगाच्या कारखान्यांना व कामगारांना नागरी सुविधा उपलब्ध होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास वस्त्रोद्योग मंत्री यांना निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त निवदेनाच्या अनुषंगाने वस्त्रोद्योग कारखाने व कामगारांना नागरी सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०४-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) भिवंडी शहरातील पाणी टंचाई दुर करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनपुरस्कृत अमृत २.० योजनेअंतर्गत भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या १०० एम.एल.डी. वाढीव पाणी पुरवठा योजनेस शासनाची मंजुरी प्राप्त झाली असून योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर भिवंडी शहराची सन २०५२ पर्यंतची पाण्याची मागणी पूर्ण होणार आहे. तसेच ४ मलशुध्दीकरण केंद्रापैकी २ मलशुध्दीकरण केंद्राचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत कामे प्रगती पथावर आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासन अंगीकृत कंपनी एनर्जी इफिशिएन्सी सव्हिसेस लिमीटेडमार्फत पथदिवे लावण्याचे काम पूर्ण झाले असून मनपा क्षेत्रात एकूण २४२४३ पथदिव्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच भिवंडी शहरातील मुख्य ५२ रस्तांचे क्राँक्रीटीकरण करण्यास मंजुरी प्राप्त झाली असून त्यापैकी १५ कामे पूर्ण झाली असून, १०

कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच १२ कामास मंजुरी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांच्यामार्फत ५ रस्त्यांचे काम पूर्ण करण्यात आले असून १५ रस्त्यांच्या क्रॉंक्रीटीकरणाच्या कामास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून पाठपुरावा करण्यात येत असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे.

भिवंडी शहरातील पाणी टंचाई दुर करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनपुरस्कृत अमृत २.० योजनेअंतर्गत काम सुरू असून ते काम पूर्ण झाल्यानंतर भिवंडी शहराची सन २०५२ पर्यंतची पाण्याची मागणी पुर्ण होणार आहे. तसेच ४ मलशुध्दीकरण केंद्रापैकी २ मलशुध्दीकरण केंद्राचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत कामे प्रगती पथावर आहेत. त्याचप्रमाणे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात २४२४३ पथदिव्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच भिवंडी शहरातील मुख्य ५२ रस्तांचे क्रॉंक्रीटीकरण करण्यास मंजुरी प्राप्त झाली असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून कामे करण्यात येत आहेत. त्यापैकी १५ कामे पूर्ण झाली असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील नियमबाह्य उंच इमारतीचे बांधकामांवर कारवाई करण्याबाबत

**(४२) ७६४८० (१७-०२-२०२४). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेसर्स भगीरथ रियल्टी प्रायव्हेट लिमिटेडने भूखंड क्रमांक २३१, CTS- १७५१, वॉर्ड क्रमांक-४०, टेम्पल रोड, मौजा सीताबर्डी, सिव्हिल लाइन्समधील उंच इमारतीचे बांधकाम नऊ महिन्यांपूर्वी इमारत नकाशा मंजूर नसतांना सुरू केल्याने नागपूर महानगरपालिकेच्या नगररचना विभाग आणि धरमपेठ झोनने माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मेसर्स भगीरथ रियल्टी प्रायव्हेट लिमिटेडला नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, संरक्षण मंत्रालयाने दिनांक १८ मे २०११ रोजी मार्गदर्शक तत्त्वे जारी केल्यानंतर तसेच संरक्षण आस्थापनांपासून ५०० मीटरच्या परिघात बांधकामांना मनाई केली असतांना नागपूर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या अभियंत्यांनी मेसर्स भगीरथ रियल्टीच्या उंच इमारतीचा इमारत नकाशा संरक्षण आस्थापनांपासून ५०० मीटरच्या परिघात मंजूर करुन UDCPR व MRTP कायदा, संरक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे स्पष्ट उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मेसर्स भगीरथ रियल्टी प्रायव्हेट लिमिटेडने २० फूट खोदकाम करुन राफ्ट फाउंडेशनचे बांधकाम सुरू केले. UDCPR नुसार नाल्यापासून बांधकामासाठी सहा मीटर अंतर सोडणे बंधनकारक असतांना मेसर्स भगीरथ रियल्टी प्रायव्हेट लिमिटेड नाल्याच्या सीमा भिंतीपासूनच राफ्ट फाउंडेशन बांधकाम केले असून सदर प्रकरणी कोणतीही कार्यवाही न झाल्याने इमारतीचा नकाशा मंजूर करण्यात आला, आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी महानगरपालिका आयुक्तांकडे दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली असतांना दोन महिन्यांच्या कालावधीनंतर देखील कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०३-२०२४) :** (१) होय.

मेसर्स भगीरथ रियल्टी प्रायव्हेट लिमिटेड भुखंड क्रमांक २३१, CTS १७५१, वार्ड क्रमांक-४०, टेम्प्पल रोड, सिताबर्डी येथील - इमारतीचा बांधकाम मंजूरीचा नकाशा महानगरपालिकेस ऑनलाईन पध्दतीने दि.२८.१०.२०२२ रोजी प्राप्त झाला होता. सदर अर्ज प्राप्त झाल्या नंतर जागा पाहणी केली असता जागेवर तळघराचे खोदकाम केल्याचे दिसून आले. त्यानुसार मंजूरी आधी जागेवर विकसनाचे काम सुरू झालेले असलेने नगर रचना विभागातर्फे मेसर्स भगीरथ

रियल्टी प्रायव्हेट लिमिटेड यांना पत्र क्र मनपाना/ नरवि/ इमारत विभाग/४३१, दि.१४.०६.२०२३ रोजी अनधिकृत विकासकाम तातडीने बंद करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तदनंतर सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेनंतर विकास परवानगी देतेवेळी विकासकाने बांधकाम मंजूरीपूर्वी केलेल्या विकासकामास प्रचलित दरानुसार दंड आकारणी करण्यात आलेली आहे.

(२) नाही.

संरक्षण विभागाच्या दि.१८ मे. २०११ च्या मार्गदर्शक तत्वानुसार संरक्षण विभागाच्या आस्थापनेपासून ५०० मीटरच्या परीघात बांधकाम करणेपूर्वी संरक्षण विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्र घेणे बाबतच्या सूचना संरक्षण विभागाने निर्गमित केलेल्या होत्या. तथापी सदर मार्गदर्शक तत्त्वे संरक्षण विभागाने दि.२१/१०/२०१६ रोजी सुधारीत केलेली आहेत. त्यानुसार संरक्षण विभागाच्या आस्थापनेपासून १० मीटर परीघक्षेत्रातील बांधकामाना संरक्षण विभागाचे ना हरकत प्रमाण पत्र घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहेत. सदर दि.२१/१०/२०१६ रोजीच्या मार्गदर्शक तत्वास अनुसरून महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी करणेकामे महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने दि.०७.११.२०१६ रोजीच्या परीपत्रकानुसार संरक्षण विभागाने दि.२१.१०.२०१६ रोजी निर्गमित केलेल्या परीपत्रकाचा अंमल करणेबाबत आदेशित केलेले आहे. त्यानूसार विषयांकीत जागा संरक्षण विभागाच्या आस्थापनेपासून ३५०.०० मी. अंतरावर असल्याने संरक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शन तत्वाचे व MRTP कायदयाचे उल्लंघन झालेले नाही.

(३) नाही.

मेसर्स भगीरथ रियालीटी प्रायव्हेट लिमिटेड यांनी प्रस्तावित केलेले बांधकाम नाल्याच्या सिमा भीतीपासून Lower Basement व Upper Basement ६.०० मीटर अंतरावर आहे. इमारतीच्या तळ मजल्याचे बांधकाम नाल्यापासून १२.१४२ मीटर अंतरावर प्रस्तावित असुन, प्रस्तावित केल्याप्रमाणे इमारत बांधकाम परवानगी दि.०७.०७.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे. निर्गमित करण्यात आलेली बांधकाम परवानगी मंजुर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० नुसार अनुज्ञेय आहे.

(४) सदर प्रकरणी दि.०७.०७.२०२३ रोजी नियमावलीतील तरतुदी नुसार परवानगी देण्यात आली असल्याने त्यानंतर दि.०५.०९.२०२३ रोजी महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे- भिवंडी - कल्याण शहरांना जोडणाऱ्या मेट्रो ५ च्या कामास दिरंगाई होत असल्याबाबत

**(४३) ७६४९२ (११-०२-२०२४). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे- भिवंडी - कल्याण शहरांना जोडणाऱ्या मेट्रो ५ च्या दुरुस्ती डेपो ठाणे-भिवंडी रस्त्यावरील कशेळी येथे प्रस्तावित असल्याचे दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डेपोकरीता आरक्षित असणारी जमीन वन व खारफुटीची असल्याने सदर जमिनीवर हा उपक्रम करण्याची परवानगी मिळण्याआधीच ५८१ कोटी रु खर्चाच्या प्रकल्पा करता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने डेपो उभारणीच्या कामासाठी कंत्राटदार निश्चित करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो मार्ग क्र.५ चा विस्तार उल्हासनगर पर्यंत वाढविण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या १५४ व्या बैठकीत तसेच सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात मान्यता देऊन सदर विस्तार उल्हासनगरपर्यंत वाढविण्याबाबतचा अहवाल तयार करण्यासाठी ई-सल्लागाराची नियुक्ती करण्यात येईल, असे जाहिर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वने व खारफुटी चा समावेश असल्याने त्याची मंजुरी मिळण्यासाठी तसेच अहवाल तयार करण्याकरीता ई-सल्लागार यांची नेमणूक करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने किती कालावधीत डेपो उभारण्याचे काम सुरु होणार आहे,

(५) असल्यास, ठाणे-भिवंडी-कल्याण शहरांना जोडणाऱ्या मेट्रो ५ च्या टप्पा क्रमांक-२ अजून हि मेट्रो भूमिगत जाणार किंवा वरून जाणार याबाबत कोणताही निर्णय अद्याप पर्यंत झालेला नसून, प्रत्यक्ष कामाची सुरुवात होण्याच्या सुमारे ८ ते १० महिने आधी कंत्राटदार निश्चित करण्याबाबतचा निर्णय कोणी व का घेण्यात आला आहे, याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(६) असल्यास, मेट्रो ५ च्या टप्पा-२ च्या कामास दिरंगाई होण्यामागची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने सदर प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०४-२०२४) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) मेट्रो मार्ग-५ (टप्पा-१) ठाणे ते भिवंडी मधील स्थापत्य कामाची प्रगती ८४.१३% झाल्यामुळे सदरचा टप्पा कार्यान्वित करण्यासाठी कशेळी येथे कारडेपोचे बांधकाम सुरु करणे निकडीचे असल्याने सदर कारडेपोच्या स्थापत्य कामाकरिता कंत्राटदाराची नियुक्ती दि.२१.०९.२०२३ रोजी स्विकृतपत्र देऊन करण्यात आली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मेट्रो मार्गिका ५ चा कार डेपो कशेळी, ता. भिवंडी, जि. ठाणे येथे २७.०० हेक्टर जागेवर प्रस्तावित असून साधारणपणे ७.८९२३ हेक्टर खारफुटीची जागा ही डेपो तसेच EHV व transmission lines साठी बाधित होत असल्याने त्याकरिता पर्यावरण, वने आणि वातावरण बदल या मंत्रालयाची मंजूरी मिळण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून यासाठी ९ महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे.
(५) मेट्रो मार्ग-५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) या उन्नत मेट्रो रेल्वे प्रकल्पातील धामणकर नाका ते टेमघर दरम्यानची सुमारे ३.०० कि.मी. अंतराच्या उन्नत मार्गिकेऐवजी भूमिगत मार्गिका करण्यास शासन निर्णय क्र.एमआरडी-३३१६/प्र.क्र.१३९(भाग-२)/नवि-७, दि.०६.०६.२०२३ अन्वये तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. तसेच टप्पा-२ मधील मेट्रोच्या कामाकरिता कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आलेली नाही.
(६) मेट्रो ५ च्या टप्पा-२ मध्ये करावयाच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

---

**केज (जि.बीड) येथील नगरपंचायतीचे "क" वर्ग नगरपरिषदेमध्ये रुपांतर करण्याबाबत**

**(४४) ७६५१४ (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि.बीड) नगरपंचायतीचे "क" वर्ग नगरपरिषदेमध्ये रुपांतर करण्यासंदर्भात, ठोस समर्थनासह प्रस्ताव जिल्हाधिकारी, बीड यांनी मंजुरीसाठी नगरविकास विभागाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केज नगरपंचायतीचे "क" वर्ग नगरपरिषदेमध्ये रुपांतर करण्यासाठीच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०४-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) केज (जि.बीड) नगरपंचायतीचे नगरपरिषदेमध्ये रुपांतर करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर शहरातील महत्वाच्या रस्त्यांच्या बांधकामासाठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४५) ७६५६१ (१६-०२-२०२४). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि. ठाणे) शहरातील महत्वाच्या रस्त्याच्या बांधकामासाठी निधी मिळावा यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या कडे मागणी केली असता मा. मुख्यमंत्री यांनी सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना दिले असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महानगरपालिका आयुक्त यांना सदर प्रस्ताव तयार करून मा. महानगर आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे मंजुरी साठी दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तवाला तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगर शहरातील काही रस्त्यांची अवस्था दयनीय झालेली असून सदर रस्ते होणे अत्यंत आवश्यक असून उक्त रस्त्यावर दरवर्षी डांबरीकरणासाठी तसेच खड्डे भरण्यासाठी लाखो रुपयाचा खर्च तसेच निधीचा अपव्यय होत असून शासनाचे धोरण महाराष्ट्र खड्डे मुक्त करण्याचे असल्याने हे रस्ते तयार करण्यासाठी निधी आवश्यकता असून सदर निधी मंजूर करावा अशी मागणी लोकप्रतिनिधी आणि महानगरपालिकेच्यावतीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०४-२०२४) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) मा.लोकप्रतिनिधींनी दि.१७.१०.२०२३ च्या पत्रामध्ये प्रस्तावित केलेल्या ८ रस्त्यांच्या कामांचे प्रस्ताव उल्हासनगर महानगरपालिकेने दि.२८.१२.२०२३ च्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सादर केले आहेत. सदर प्रस्तावाची छाननी करून प्राधिकरणाकडील निधीच्या उपलब्धतेनुसार व अस्तित्वातील उर्वरीत कामे यांचा विचार करून सदर रस्त्यांच्या बळकटीकरण करण्यासंबंधीची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माथेरान (ता.कर्जत,जि.रायगड) येथील बंद पडलेला ई-रिक्षा सेवा वाहतूक प्रकल्प पुन्हा सुरु करण्याबाबत**

**(४६) ७६७५५ (११-०२-२०२४). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) या थंड हवेच्या ठिकाणी व प्रामुख्याने डोंगराळ असलेल्या भागात दि.५ डिसेंबर, २०२३ ते ४ मार्च, २०२३ या कालावधीत माथेरान नगरपरिषदेने नागरिकांच्या वाहतुकीचा ई-रिक्षांचा पायलट प्रकल्प राबविण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ई-रिक्षा प्रकल्पामुळे नागरिकांची वाहतुकीची गैरसोय दूर होऊन त्याचा फायदा जेष्ठ नागरिक, विद्यार्थी व पालकांना झाल्यामुळे नागरिकांनी या प्रकल्पास सर्वाधिक पसंती देऊन सदर उपक्रम पुन्हा कायमस्वरुपी राबविण्याची मागणी केली असल्याचे दि.५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तथापि सदर ई-रिक्षा सेवा गेल्या सहा महिन्यांपासून बंद करण्यांत आली असून, ई-रिक्षा सेवा माथेरान नगरपालिकेच्या आवारातच बंद असल्याचे दि.५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागरिकांच्या मागणीचा विचार करुन ई-रिक्षा सेवा प्रकल्प तातडीने पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) माथेरान नगरपरिषदेमार्फत प्रायोगिक तत्वावर कार्यान्वित केलेला ई-रिक्षा प्रकल्प पुढील आदेश होईपर्यंत सुरू ठेवण्याचे निर्देश मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२२/११/२०२३ रोजी दिले असून त्यानुसार ई-रिक्षा सेवा सुरु ठेवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-भाईंदर (जि.ठाणे) खाडीवरील प्रस्तावित पुलाच्या जागेबाबत**

**(४७) ७७०९९ (१५-०२-२०२४). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-भाईदर खाडीवरील प्रस्तावित पुलासाठी मिठागरांच्या तसेच कांदळवनाच्या जागेचा अडथळा निर्माण झाला असल्याची बाब दिनांक २४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जागेबाबत तोडगा काढून सदर प्रकरण निकालात काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वसई-भाईदर खाडीपूलाचे संरेखन आराखडा हा मिठागर व वन विभाग मधून जात असल्याकारणाने मिठागरे विभाग, महाराष्ट्र सागरी किनारा नियंत्रण प्राधिकरण (MCZMA), राज्य पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण (SEIAA), महाराष्ट्र सागरी मंडळ (MMB), भारतीय अंतर्देशिय जलमार्ग प्राधिकरण (IWAI), वन विभाग इ. विभागांच्या परवानग्या आवश्यक आहेत. त्यानुसार मिठागरे विभाग व वन विभाग यांच्या परवानग्या वगळता इतर विभागाच्या परवानग्या प्राप्त झाल्या आहेत.

सदर प्रकल्पाच्या बांधकामामध्ये मिठागराचे एकूण ९.८६२५ हेक्टर क्षेत्र बाधित होत आहे. बाधित होणा-या मिठागर जमिनीची बाजारभावाप्रमाणे रू.३२,४३,५५,४५५/- इतकी रक्कम भरणा करण्याबाबत मिठागर विभागाने प्राधिकरणास कळविले आहे. मिठ उत्पादक/ पट्टेदार यांना देयक देण्याबाबतची कार्यवाही प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

सदर प्रकल्पामध्ये कांदळवन कक्ष, मुंबई व ठाणे या दोन्ही विभाग संबंधित आहेत. वन विभागाच्या मंजूरीसाठी सदर दोन्ही विभागास माहे जून, २०१७ रोजी वनक्षेत्र वळतीकरणाचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यापैकी कांदळवन कक्ष, मुंबई यांनी सदर प्रस्ताव मंजूर करून APCCF, नोडल ऑफीस, नागपूर यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. संबंधित कार्यालयाने वृक्षरोपणासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याबाबतच्या त्रुटीची पुर्तता करून प्रस्ताव सादर करण्याचे कळविले आहे. त्यानुसार मौजे-बाडाणेखरण, ता.डहाणू, जिल्हा-पालघर येथील जागा वृक्षारोपणासाठी पर्यायी जागा म्हणून उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सदर प्रस्ताव प्रलंबित असून, प्राधिकरणामार्फत पाठपुरावा सुरू आहे.

वन विभाग व मिठागरे यांच्याकडून परवानग्या प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील मजास आगार डेपो व मरोळ बस आगार येथे बेस्ट बस फे-या वाढविण्याबाबत

**(४८) ७७४१२ (१५-०२-२०२४). श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी व जोगेश्वरी विभागात मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग असून या विभागात सिप्झ व इतर लघुउदयोग आहेत तसेच विद्यार्थी वर्ग, जेष्ठ नागरीक यांना नियमित ठिकाणी वेळेवर पोहचता येत नसल्यामुळे नागरिकांच्या मागणीनुसार लोकप्रतिनिधींनी मजास आगार डेपो व मरोळ आगार बस फेऱ्या वाढविण्याबाबत सातत्याने निवेदने, पत्रव्यवहार करूनही अदयाप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार आगार प्रमुखांकडून मनुष्यबळ कमी असल्याचे कारण सांगून बस फेऱ्या वाढविण्याबाबत टाळाटाळ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगार व प्रवाशांची वाहतूक कोंडीमुळे होणारी अडचण लक्षात घेऊन तात्काळ बस फेऱ्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) अंधेरी, जोगेश्वरीसह मुंबईतील अनेक भागांमध्ये पुरेशा बससेवेअभावी प्रवाशांची काही प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे.

बेस्ट उपक्रमाकडील आयुर्मान संपलेल्या बसगाड्या उपक्रमाच्या ताफ्यातून निष्कासित झाल्यानंतर सदर बसगाड्यांची पूर्तता करण्याकरिता नवीन बसगाड्या विकत घेणे शक्य होत नाही. याकरिता बेस्ट उपक्रमाने भाडेतत्वावर बसगाड्या प्रवर्तनात आणण्यास सुरुवात केलेली आहे. तथापि या बसगाड्यांचे प्रमाण तुलनेने कमी असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. मात्र भाडेतत्वावरील बसगाड्या लवकरात लवकर बेस्ट उपक्रमाच्या बसताफ्यात समाविष्ट करण्याकरिता बेस्ट प्रशासन प्रयत्नशील आहे.

(२) हे खरे नाही.

बसगाड्यांअभावी बसफेऱ्यांमध्ये वाढ करणे शक्य होत नाही.

(३) बेस्ट प्रशासनाच्या वतीने सद्य:स्थितीत ५१३५ बसगाड्यांची मागणी नोंदविण्यात आली असून यापैकी १८९१ बसगाड्या बेस्ट उपक्रमाच्या बसताफ्यात दाखल झाल्या आहेत व उर्वरित बसगाड्या लवकरात लवकर उपक्रमाच्या बसताफ्यात समाविष्ट करण्याकरिता संबंधित बसपुरवठादार व्यवसाय संस्थांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेच्या आस्थापनांवरील मंजूर पदांबाबत

**(४९) ७९३१५ (०६-०२-२०२४). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदे मंजूरीबाबत शासन निर्णय क्रमांक भिनिम-२०२२/प्र.क्र.१०१/नवि-२३, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी महानगरपालिकेचे काही वरीष्ठ अधिकारी अमंलबजावणी करणे सदर्भात टाळाटाळ करून शासनाची व महानगरपालिकेची दिशाभूल करीत असून या संबंधी त्वरीत प्रस्ताव मंजुर करणे गरजेचे असतांना देखील अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व शासन निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन संबंधित आस्थापनेवरील अधिकारी-कर्मचारी यांना पदोन्नती देण्यासंबंधी टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०४-२०२४) :** (१), (२) व (३) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नवीन पदनिर्मितीच्या प्रस्तावास शासन मंजूरी देण्यात आली आहे. तसेच महानगरपालिकेकरीता सेवा प्रवेश नियम २०२२ निर्गमित करण्यात आले आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील पद भरतीची कार्यवाही शासनाने मंजूर केलेल्या सेवा प्रवेश नियमानुसार व शासनाच्या प्रचलित धोरणानुसार महानगरपालिका स्तरावर सुरु असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार-नालासोपारा (जि.पालघर) या परिसरातील रहिवाशांना सुर्या धरणा अंतर्गत पाणीपुरवठा करण्याबाबत

**(५०) ७९३२० (०६-०२-२०२४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार-नालासोपारा (जि.पालघर) या परिसरातील रहिवाशांना सुर्या धरणाअंतर्गत पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले असून या सूर्याधरण प्रकल्पाचे लोकार्पण दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रस्तावित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नालासोपारा (पश्चिम) (ता.वसई, जि.पालघर) येथील संबंधित गृहनिर्माण संस्थांकडून महानगरपालिकेकडे वेळोवेळी मौखिकरित्या तसेच लेखी स्वरुपात तक्रार करुनही चक्रधर नगर परिसरातील सम्राट नटवर पॅलेस, सम्राट श्री कृष्णा पॅलेस, सम्राट रशेस पॅलेस, गोकूळ वाटिका, सम्राट भावेश पॅलेस, राजमुद्रा, सम्राट रमण आशिष, धरम पॅलेस, रोमल गार्डन, ओम साई प्रसाद, इत्यादी सहकारी गृहनिर्माण संस्थाना माहे सप्टेंबर, २०२२ पासून महानगरपालिकेकडून अपुरा पाणी पूरवठा होत असल्याने नागरिकांची अत्यंत गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर परिसरातील गृहनिर्माण संस्थांना पुरेसा पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२४) :** (१), (२) व (३) सुर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना प्रकल्पाचा टप्पा १ कार्यान्वित करण्यात आला असून दिनांक १५.११.२०२३ पासून वसई विरार शहर महानगरपालिकेस नियमित पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा दिनांक १२.०१.२०२४ रोजी संपन्न झाला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्राची पाण्याची मागणी ३७२ द.ल.ली प्रतिदिन इतकी असून दिनांक १५.११.२०२३ पुर्वी महानगरपालिकेस सर्व स्त्रोतातून उपलब्ध होणारे पाणी विचारात घेता काही भागात पाण्याची तूट व अनियमित पाणीपुरवठा होत होता, ही वस्तुस्थिती आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार सुर्या पाणीपुरवठा योजनेतून दैनंदिन ८० ते ९० द.ल.ली. पाणी चाचणी स्वरुपात दिनांक १५.११.२०२३ पासून उपलब्ध झाले आहे. सदर पाणी विविध भागातील नागरीकांना महानगरपालिकेच्या जलवाहीन्यांमार्फत उपलब्ध करुन देण्यात आले असून सद्यस्थितीत चक्रधर नगर परिसरातील सम्राट

नटवर पॅलेस, सम्राट श्री कृष्णा पॅलेस, सम्राट रशेस पॅलेस, गोकूळ वाटिका, सम्राट भावेश पॅलेस, राजमुद्रा, सम्राट रमण आशिष, धरम पॅलेस, रोमल गार्डन, ओम साई प्रसाद, इत्यादी सहकारी गृहनिर्माण संस्थाना सुरळीतरीत्या पाणीपुरवठा करण्यात येत असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.